Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

# वस्तु व सेवा कर (जीएसटी) अंमलबजावणीच्या प्रतीक्षेत

**प्रा. डॉ. सुनील पं. उगले,**
**उपप्राचार्य व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,**
**क्रांतीवीर व्ही. एन. नाईक महाविद्यालय, दिंडोरी**

- **प्रस्तावना -**

केंद्र सरकारच्या एकुण उत्पन्नात प्रत्यक्ष करांपेक्षा अप्रत्यक्ष करांचा वाटा जास्त असल्यामुळे अप्रत्यक्ष करांचे महत्त्व नेहमीच अधिक राहिले आहे. राज्यघटनेत तरतुद केल्याप्रमाणे कर आकारणी व कर वसुली यांच्या अधिकाराची केंद्र व राज्य सरकार यांच्यात विभागणी केलेली आहे. सार्वजनिक वित्त व्यवहाराच्या व्यवस्थेनुसार वस्तु निर्माण उद्योगांवर उत्पादन शुल्क आकारण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे. वस्तुची विक्री व वितरणावर कर आकारण्याचा अधिकार राज्य सरकारला देण्यात आला आहे. तर जकात, स्थानिक संस्था कर (एलबीटी) आकारण्याचा अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना आहे.

सरकारच्या खर्चात जसजशी वाढ होत गेली तसतसे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी अप्रत्यक्ष कराच्या दरात व कक्षेत सातत्याने वाढ केली गेली. त्यामुळे अप्रत्यक्ष करातील वाढीमुळे कर चुकवेगिरी व भ्रष्टाचाराला चालना मिळाली. इतर देशांच्या तुलनेत भारतातील अप्रत्यक्ष करांचे दर जास्त आहे. वाढत्या करांमुळे वस्तुचा उत्पादन खर्च व वितरण खर्च वाढत जाऊन व्यापार व उद्योगक्षेत्राच्या विस्तारावर सतत बंधने येत गेली व उद्योगांची बाजारपेठीय स्पर्धा शक्तीही कमी-कमी होत गेली. यातुन मार्ग काढण्यासाठी व देशातील अप्रत्यक्ष कर कमी करुन त्याऐवजी एकच सर्वसमावेशक कर प्रणाली आणावी अशा प्रस्ताव पुढे आला. हा नवीन कर प्रस्ताव म्हणजेच वस्तु व सेवा कर - जीएसटी (Goods & Service Tax - GST) होय. गेल्या पंधरा वर्षापासुन म्हणजे 2000 पासुन जीएसटीवर चर्चा चालु आहे मात्र अद्याप अंमलबजावणीच्या प्रतीक्षेत आहे.

वस्तु व सेवा कर स्वतंत्ररित्या न आकारता एकात्मिक पध्दतीने आकारला जाणार आहे. जीएसटी हा मुल्यवर्धीत करप्रणालीच्या तत्त्वावर आधारित एक अप्रत्यक्ष कर असुन ही कर पध्दती समजायला सोपी, अंमलबजावणीसाठी कमी गुंतागुंतीची व उत्पन्न वाढीसाठी अधिक पोषक असली पाहिजे याच उद्देशाने जीएसटी प्रस्ताव आणण्यात आला. 1947 नंतरची कररचनेतील ही एक सर्वात मोठी प्रस्तावित करसुधारणा आहे. जीएसटी करप्रणाली जाणुन घेण्यासाठी व अंमलबजावणीतील अडचणीचा अभ्यास करण्यासाठीच हा शोधनिबंधाचा विषय निवडला आहे.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

- **शोधनिबंधाची उदिष्टे**

1. भारतातील अप्रत्यक्ष करपध्दतीतील गुण दोषांचा अभ्यास करणे.
2. प्रस्तावित वस्तु व सेवा कर प्रणालीचे स्वरुप व महत्त्व जाणुन घेणे.
3. प्रस्तावित वस्तु व सेवा कर प्रणालीच्या वैशिष्टांचा अभ्यास करणे.
4. प्रस्तावित वस्तु व सेवा कर प्रस्तावाच्या अंमलबजावणीतील अडथळांचा अभ्यास करणे.

- **शोधनिबंधाचे गृहितक -**

भारतात अनेक प्रकारचे अप्रत्यक्ष कर आकारले जातात. त्यांची कार्यपध्दतीही राज्यांनुसार भिन्न व गुंतागुतीची आहे. त्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कालानुरुप कररचनेत बदल करणे अपेक्षित असुन त्याऐवजी एकच सर्वसमावेशक कर असणे आवश्यक आहे.

- **संशोधन पध्दती -**


वस्तु व सेवा कर प्रस्तावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नसल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी फक्त दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. त्यासाठी प्रस्तावीत वस्तु व सेवा कर प्रस्तावाचा आराखडा, विविध मासिकातील लेख, लोकसभा व राज्यसभेतील चर्चा, संदर्भग्रंथ, अर्थतज्ज्ञांची मते, वर्तमानपत्रातील बातम्या यांचा आधार घेतला आहे.

- **करविषयक सुधारणांची आवश्यकता व वाटचाल -**

1954 मध्ये फ्रान्स या देशाने सर्वप्रथम जीएसटीचा अवलंब केला. आज सुमारे 140 पेक्षा जास्त देशांमध्ये ही करपध्दती वापरली जात आहे. सिंगापुर व मलेशिया सारख्या देशात सुध्दा जीएसटी प्रणाली यशस्वी झाली आहे. भारतात 2000 मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात जीएसटीसाठी रोड मॅप समिती स्थापन करण्यात आली होती. प. बंगालचे वित्तमंत्री असीम दासगुप्ता तिचे अध्यक्ष होते. 2004 मध्ये विजय केळकर यांच्या कार्यगटाने जीएसटी ही संकल्पना मांडली. 1991 मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरणाचा अंगीकार केला. या आर्थिक धोरणाचा मुख्य भर करविषयक धोरण व आर्थिक सुधारणा राबविणे हा होता. त्याअनुषंगाने कालानुरुप कररचनेत बदल केले गेले. अप्रत्यक्ष करप्रणालीतील गुंतागुंत कमी करुन एकच सर्वसमावेशक कर आणण्यासाठी पुढाकार घेतला गेला. सद्यस्थितीत भारतात अप्रत्यक्ष कररचना फारच गुंतागुतांची असुन केंद्र व राज्य सरकार विविध प्रकारचे कर आकारते शिवाय करांच्या दरातही तफावत आहे.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

**भारतातील सद्याची अप्रत्यक्ष कररचना**




वरील प्रमाणे विविध प्रकारचे कर असल्यामुळे वस्तु व सेवांच्या किंमतीत सातत्याने वाढ होत जाते. अप्रत्यक्ष करातील वाढीमुळे प्रामाणिकपणे कर भरण्यापेक्षा कर चुकवेगिरी व भ्रष्टाचाराला चालना मिळाली. यावर उपाय म्हणुन भारतात एकच अप्रत्यक्ष करप्रणाली आणण्यासाठी पुढाकार घेतला गेला. त्याचाच एक भाग म्हणुन वस्तु व सेवा कर - जीएसटी कायदा लागु करण्यासाठी 2009 मध्ये राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या उच्चाधिकार समितीने एक संयुक्त गट स्थापन केला. भारतीय संविधानातील तरतुदीनुसार केंद्र सरकारला उत्पादन क्षेत्राशिवाय इतर कर लावण्याचा तर राज्यांना सेवा कर आकारण्याचा अधिकार नाही. म्हणुन जीएसटी लागु करण्यासाठी घटनात्मक दुरुस्ती करणे आवश्यक आहे. माजी केंद्रिय अर्थमंत्री पी. चिदंबरम् यांनी 22 मार्च 2011 रोजी 115 वे दुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडले. मात्र सदर विधेयक घटना दुरुस्तीचे असल्याने व त्याला बराच विरोध झाल्यामुळे ते संमत होऊ शकले नाही.

करांचे दर, सवलती आणि मर्यादा यासारखा मुद्यांवर शिफारशी करण्यासाठी जीएसटी मंडळाची स्थापना करण्याची योजना प्रस्तावित विधेयकात केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री आणि राज्ये व केंद्रशासित प्रदेशाचे अर्थमंत्री यांचे मिळुन हे जीएसटी मंडळ असेल. जर केंद्र किंवा राज्य सरकारने जीएसटी मंडळाच्या शिफारशी डावलुन एकदा निर्णय घेतल्यास व त्यातुन तंटे निर्माण झाल्यास असे तंटे सोडविण्यासाठी जीएसटी तंटा निवारण प्राधिकरण स्थापन करण्याची तरतूद विधेयकात करण्यात आली आहे. या प्राधिकरणासाठी एक अध्यक्ष व दोन सदस्यांची नेमणुक केली जाईल. आता पुन्हा नव्याने नव्या सरकारने हे विधेयक लागु करण्याच्या हालचाली सुरु केल्या आहे. अर्थमंत्री अरुण जेटली यांनी मुळ विधेयकात अनेक दुरुस्त्या करुन लोकसभेत एप्रिल 2015 मध्ये हे विधेयक मांडले. लोकसभेत सत्ताधारी पक्षाला बहुमत असल्यामुळे लोकसभेत ते मंजुर झाले. वस्तु व सेवा कर - जीएसटी विधेयक हे घटना दुरुस्ती विधेयक असल्यामुळे ते पारित करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमत आवश्यक आहे. मात्र राज्यसभेत बहुमत नसल्यामुळे सरकारने माघार घेत हे वादग्रस्त विधेयक राज्यसभेच्या निवड समितीकडे पाठविण्यात आले आहे. सद्या राज्यसभेच्या मंजुरीच्या प्रतिक्षेत हे विधेयक असुन प्रत्यक्षात ते कधीपासुन अंमलात येईल याची प्रतीक्षा आहे. शिवाय संसदेने हे विधेयक पारित केल्यानंतर देशातील 29 पैकी किमान 15 राज्यांनाही विधिमंडळात हे विधेयक पारित करावे लागणार आहे.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

सरकारने मुख्य आर्थिक सल्लगार अरविंद सुब्रमणियम यांच्या अध्यक्षतेखाली जीएसटी समिती नेमली आहे. या समितीने विरोधी पक्षांच्या विविध सूचना विचारात घेऊन अहवाल सादर केला आहे. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार वस्तु व सेवा कर - जीएसटीसाठी महसुल निरपेक्ष दर 15 ते 15.5 टक्के ठेवण्यात यावा. प्रमाणित दर 17 ते 18 टक्के असावा आणि चैनीच्या वस्तु व सेवा आणि विशेषत: तंबाखुवर जीएसटी दर 40 टक्के असावा. मात्र सार्वजनिक वापराच्या वस्तुंवर तो 12 टक्के असावा अशी शिफारस समितीने केली आहे. घटना दुरुस्ती विधेयकात विशिष्ट जीएसटी दराचा उल्लेख न करण्याची, तसेच जीएसटी दराची कमाल मर्यादा न करण्याचीही समितीची शिफारस आहे.

- **वस्तु व सेवा कर - जीएसटीचे स्वरुप -**

वस्तु व सेवा कर हा एक अप्रत्यक्ष कर असुन तो उत्पादन, विक्रि व वापर यावरील देशपातळीवरील एकच सर्वसमावेशक कर असणार आहे. संपुर्ण देशभर वस्तु व सेवा कराचा दर हा एकच असेल. तो मध्यवर्ती उत्पादन शुल्क, सीमा शुल्क, सेवा कर, मुल्यवर्धित कर (व्हॅट -राज्यांतर्गत विक्रि कर), केंद्रिय विक्रि कर (आंतर राज्य विक्रिवरचा कर) या अप्रत्यक्ष करांऐवजी वस्तु व सेवा कर येणार आहे. काही वस्तुंचा अपवाद वगळता जवळजवळ सर्वच प्रकारच्या वस्तु व सेवांवर हा आकारला जाईल. थोडक्यात केंद्र व राज्यपातळीवर सद्या जे अनेक अप्रत्यक्ष कर आकारले जात आहे ते सर्व कर रद्द करुन त्याऐवजी एकच वस्तु व सेवा कर - जीएसटी आकारला जाईल. वस्तु व सेवा कराची विभागणी तीन भागात केली जाईल.

**प्रस्तावित जीएसटी कररचना**

1) **केंद्रीय वस्तु व सेवा कर - सीजीएसटी** (Center Goods & Service Tax - CGST) ऊ

केंद्रीय वस्तु व सेवा करामध्ये केंद्रीय अबकारी कर (CENVAT- Center VAT), सेवा कर, अतिरिक्त अबकारी कर, अतिरिक्त सीमा शुल्क, सेवा, अधिभार व उपकर हे कर वर्ग केले जातील. केंद्रीय वस्तु व सेवा कराचा दर 7 टक्के असावा असे उच्चाधिकार समितीने सुचविले. याकरापासुन मिळणारे उत्पन्न केंद्र सरकारला मिळेल.

2) **राज्य वस्तु व सेवा कर - सीजीएसटी** (State Goods & Service Tax - SGST) –

राज्य वस्तु व सेवा करामध्ये राज्य व्हॅट, विक्रि कर, करमणुक कर (स्थानिक स्वराज्य संस्थांचा वगळुन), जकात कर, प्रवेश कर, लॉटरी, जुगार व सटट्यावरील कर, विजेवरील कर, लक्झरी कर, राज्य अधिभार व उपकर इ. कर वर्ग केले जातील. राज्य वस्तु व सेवा कराचा दर 8 टक्के असावा असे उच्चाधिकार समितीने सुचविले. याकरापासुन मिळणारे उत्पन्न राज्य सरकारला मिळेल.

3) **आंतर राज्य वस्तु व सेवा कर - सीजीएसटी** (Integrated Goods & Service Tax - IGST) -

आंतर राज्य वस्तु व सेवा करापासुन मिळणारे उत्पन्न केंद्र सरकारकडे जमा केले जाईल. विशेषत: एका राज्यातुन दुसऱ्या राज्यात होणाऱ्या विक्रिवरील कराची विभागणी होईल.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

- **सद्याच्या व प्रस्तावित वस्तु कराचा तुलनात्मक अभ्यास**

**अ) सद्याचा वस्तुवरील कर**

1. **छोट्या गाडया** (किंमत रु 10लाख) - राज्य व्हॅट रु 1 लाख 25 हजार (12.5%) व उत्पादन शुल्क / कर रु 1 लाख 25 हजार (12.5 %)

= गाडीची एकुण किंमत रु 12 लाख 50 हजार (मुळ किंमत रु 10लाख + रु 1.25 लाख -व्हॅट + रु 1.25 लाख - उत्पादन शुल्क)

2. **मोठया गाडया** - (किंमत रु 20लाख) - राज्य व्हॅट रु 2 लाख 50 हजार (12.5%) व उत्पादन शुल्क / कर रु 2 लाख 50 हजार (12.5 %)

= गाडीची एकुण किंमत रु 25 लाख (मुळ किंमत रु 20 लाख + रु 2.50 लाख-व्हॅट + रु 2.50 लाख-उत्पादन शुल्क)

**वस्तु कराची विभागणी ङ्ग**

अ) राज्याला मिळणारा कर - रु 1.25 लाख किंवा 2.50 लाख

ब) केंद्राला मिळणारा कर - रु 1.25 लाख किंवा 2.50 लाख

क) एकुण रुकर उत्पन्न = रु 2.50लाख किंवा 5 लाख

**ब) प्रस्तावित जीएसटी कर**

1. **गाडीची मुळ किंमत** रु 10लाख - एसजीएसटी - रु 80 हजार (8 %) तर सीजीएसटी रु 1 लाख 20 हजार (12 %)

= गाडीची एकुण किंमत रु 12.00 लाख (मुळ किंमत रु 10लाख + एसजीसटी रु 80 हजार + सीजीएसटी रु 1.20 लाख)

**वस्तु कराची विभागणी -**

अ) राज्याला मिळणारा कर SGST - रु 80.00 हजार

ब) केंद्राला मिळणारा कर CGST - रु 1.20 हजार

क) एकुण जीएसटी कर उत्पन्न = रु 2.00 लाख

| अ. क्र. | तपशिल | सद्यास्थितीतील कर | सुधारित जीएसटी कर | फरक |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरुवातीची किंमत | रु 10.00 लाख | रु 10.00लाख | 00.00 |
| 2 | केंद्रिय कर | रु 1.25 लाख | रु 1.20 लाख | - 5 हजार |
| 3 | राज्य कर | रु 1.25 लाख | रु 0.80 लाख | - 45 हजार |
| 4 | एकुण कर | रु 2.50 लाख | रु 2.00 लाख | - 50 हजार |
| 5 | अंतीम ग्राहकाने दिलेली किंमत | रु 12.50 लाख | रु 12.00 लाख | - 50 हजार |

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

वरीलप्रमाणे कर आकारणी झाल्यास व्यापारी व ग्राहकांवर पडणारा कराचा बोजा कमी होऊन वस्तु व सेवांच्या किंमती कमी होण्यास मदत होईल मात्र जीएसटीचा अंतीम मसुदा अद्याप मंजुर झालेला नाही. त्यात अजुन अनेक बदल होऊ शकता त्यानंतरच अंतीम चित्र स्पष्ट होईल.

वस्तु व सेवा कर वस्तुंसह सेवांवरही लागु होणार आहे. सद्या 1000 रुपयाच्या बिलावर सरासरी 12.5 % म्हणजे 125 कर भरावा लागतो. मात्र जीएसटी मागु झाल्यास तो 18 % म्हणजेच 180 कर भरावा लागेल. त्यामुळे सेवा स्वस्त होण्याऐवजी महाग होतील. केंद्र सरकारने जीएसटी लागु करण्याच्या पहिल्या वर्षी दराची त्रिस्तरीय वर्गवारी असेल असा प्रस्ताव मांडला. जीवनावश्यक वस्तुंवर 6 टक्के, सेवा कर 8 टक्के तर प्रमाण दर 9 टक्कांवर आणण्यात येईल. आणि त्यानंतराच्या वर्षात 8 टक्के असेल. याच प्रमाणे जीवनावश्यक वस्तुंवरील कर 6 टक्के हा तिसऱ्या वर्षी 8 टक्के होईल आणि तिसऱ्या वर्षी वस्तु व सेवा कराचा दर एकच राहिल अशी तरतुद आहे. मात्र त्यात अजुनही काही बदल होऊ शकता.

- **वस्तु व सेवा करापासुन मिळणारे फायदे -**

**1. करपध्दतीत सुसूत्रता -**

भारतात अनेक प्रकारचे अप्रत्यक्ष कर आकारले जातात. त्यांची कार्यपध्दततीही भिन्न आहे. त्यामुळे कर भरतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. वस्तु व सेवा कर ही जगात मान्य झालेली करप्रणाली आहे. जीएसटीमध्ये केंद्रीकृत व विकेंद्रीकृत अशा दोन्ही प्रकारच्या सर्वोत्तम मॉडेलचा अवलंब करण्यात आला आहे. करपध्दतीतील सुटसुटीतपणामुळे व्यापारांना फायदा होईल. त्यांना रिटर्न भरावे लागणार नाही.

**2. करात एकसमानता येईल -**

जीएसटीच्या माध्यमातुन विभिन्न राज्यातील करांची भिन्नता दूर करुन सर्वसमावेशक असा एकच दर आकारणे, वस्तु व सेवांच्या विक्रित एकजिनसीपणा आणणे हे महत्त्वाचे उद्दिष्टे यातुन साध्य होणार आहे. समान करामुळे सर्व राज्यात एकसुत्रता येईल.

**3. अनेक कर कमी होतील -**

भारतात वस्तु व सेवा कर करप्रणाली लागु झाल्यास अनेक अप्रत्यक्ष कर कमी होऊन एकच जीएसटी कर येईल. जीएसटीमुळे केंद्रीय अबकारी कर, सेवा कर, अतिरिक्त सीमा शुल्क, अधिभार, उपकर, राज्य व्हॅट, विक्रि कर, करमणुक कर, जकात कर, प्रवेश कर इ. कर कमी होऊन जीएसटीत समाविष्ठ होतील.

**4. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ -**

भारतात वस्तु व सेवा कर करप्रणाली लागु झाल्यास राज्याराज्यातील अप्रत्यक्ष करातील भिन्नता नष्ट होऊन एकसमान कर आकारणी व पारदर्शकता यामुळे आंतरराज्य व्यापाराला प्रोत्साहन मिळुन आर्थिक विकासाबरोबरच राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल. शिवाय सद्या कर न भरणाऱ्यांनाही कराच्या जाळयात आणता येईल.

**5. उद्योजक व व्यापारांना फायदेशीर -**

सद्याच्या करपध्दतीमुळे उत्पादक व व्यापारांना करपध्दतीतील किचकटपणामुळे अनेक समास्यांना सामोरे जावे लागते. वेळ, पैसा व श्रमाचाही अपव्यय होता. नवीन करपध्दतीतील सुसूत्रतेमुळे त्यांना लाभ होऊन वेळ, पैसा व श्रमाचीही बचत होईल. शिवाय करावर भरावा लागणारा करही वाचेल. संपुर्ण कराची देय रक्कम करातुन वजावट मिळेल. उत्पादकांच्या दृष्टीने ही व्यवस्था अधिक सोपी असेल. त्यांना आता चार वेगवेगळया विभागांमध्ये कर भरण्यासाठी आवेदनपत्र सादर करावे लागणार नाही.

**6. किंमतीत घट -**

भारतात वस्तु व सेवांच्या किंमतीत सातत्याने वाढ होतांना दिसते. कारण एकाच वस्तु व सेवांवर विविध प्रकारचे अप्रत्यक्ष कर आकारले जातात. सद्यस्थितीत कच्चामाल व पक्का माल या दोघांवर कर आकारला जातो. जीएसटीतून व्यापारांची द्वि-कर भारातुन सुटका होईल. अंतिम विक्रिवरचा कर आणि अंतरिम वस्तुच्या करांवर सुट यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन वस्तुच्या किंमती कमी होतील. वस्तु व सेवा कर प्रणालीमुळे कराचा बोजा कमी होऊन वस्तु व सेवांच्या किंमती आपोआप कमी होतील. किंमती कमी झाल्यामुळे ग्राहकांची खरेदी शक्तीही वाढेल.

**7. करचुकवेगिरीला आळा -**

भारतात कर बुडविणाऱ्यांचे प्रमाण व भ्रष्टाचाराचे प्रमाण सर्वात जास्त आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे विविध प्रकारचे कर व कराचे अतिउच्च दर हे होय. वस्तु व सेवा कराच्या आकारणीमुळे अप्रत्यक्ष कराची संख्या तर कमी होईलच शिवाय करांचे दरही कमी होतील अशी अपेक्षा आहे.

**8. आर्थिक विकासाला चालना -**

जीएसटीमुळे करांचा जंजाळ कमी झाल्यामुळे व्यापार-उद्योग यात सुलभता येऊन व्यापारात वाढ होईल. भारतात वस्तु व सेवा कर करप्रणाली लागु झाल्यास राज्याराज्यातील अप्रत्यक्ष करातील भिन्नता नष्ट होऊन एकसमान कर आकारणी व पारदर्शकता यामुळे आंतरराज्य व्यापाराला प्रोत्साहन मिळेल, आर्थिक विकासाला चालना मिळेल त्यामुळे आर्थिक विकासाचा दर वाढुन भारत आर्थिक महासत्ता होण्याच्या दृष्टीने हातभार लागेल. आर्थिक विकास किती होईल यापेक्षाही अर्थव्यवस्थतेत सुसंगती येईल याला जास्त महत्त्व आहे.

**9. संपुर्ण देश एकच बाजारपेठ -**

वस्तु व सेवा कर करप्रणालीमुळे प्रशासकीय कामकाजात सुधारणा होईल आणि संपुर्ण देशाची एक बाजारपेठ बनल्याने 'मेक इन इंडिया' ला बळ मिळेल. कराचा एकच दर व एकच नियमावली असल्यामुळे आंतरराज्य व्यापारही वाढेल. सर्व राज्यात वस्तु व सेवांची एकच किंमत राहील त्यामुळे संपुर्ण देशाची एकच बाजारपेठ निर्माण होईल.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

**10. कर अंमलबजावणी व वसुलीचा खर्च कमी -**

एक कर पध्दतीमुळे कर अंमलबजावणी व वसुलीचा खर्च कमी होईल. एकाच ठिकाणी कर भरण्याची व्यवस्था असेल त्यामुळे वेळ, पैसा व श्रम वाचतील. प्रस्तावित करप्रणाली अधिक न्याय, पारदर्शक आणि एकुण उत्पादन खर्च कमी करणारी आहे. ज्याठिकाणी वस्तु विकली जाईल तेथेच कर आकारला जाईल.

**11. जबाबदारीची विभागणी -**

केंद्रीय स्तरावरील मर्यादित अधिकाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन मोठ्या संख्येने असलेल्या व्यापारांच्या व्यवहारावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात यावी तर व्यापारांची नोंदणी, कर भरणा आणि विवरण पत्र जमा करण्यासारखी दैनंदिन कामकाजाची जबाबदारी राज्यांना देण्यात येणार आहे. यामुळे व्यापारी ज्या ठिकाणी राहतो त्याच ठिकाणी त्यांची नोंदणी व कराचा भरणा करणे शक्य होईल. याशिवाय करचुकवेगिरी रोखण्यासाठी दोन्ही अधिकाऱ्यांमध्ये जबाबदारी वाटण्यात येईल.

**12. उत्पन्नाची विभागणी -**

जबाबदारीप्रमाणेच केंद्र व राज्यांच्या उत्पन्नाची विभागणी करणे सहज शक्य होईल. नोंदणीकृत व्यापाऱ्याने भरलेले कर सरकारच्या बँक खात्यात जमा होईल. सीजीएसटी करापासुन जमा झालेले उत्पन्न केंद्र सरकारच्या खात्यात तर एसजीएसटी करापासुन मिळणारे उत्पन्न राज्य सरकारच्या खात्यात जमा होईल.

**13. अर्थकारणाला गती मिळेल -**

जीएसटीमुळे अर्थकारणाला गती मिळेल याबाबत कॉंग्रेससह सर्वच विरोधी पक्ष व सत्ताधारी यांना आशा आहे. जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे अर्थव्यवस्थतेला 60 लाख कोटी रुपयाचा फायदा होईल हे विरोधकही मान्य करतात.

**14. किंमतीत एकसमानता -**

सद्या राज्याराज्यात कराच्या दरात भिन्नता आहे. तसेच ग्रामीण भागापेक्षा महानगरपालिका क्षेत्रातातील करातही तफावत आहे. अनेक वस्तु व सेवा शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात स्वस्त मिळतात कारण करांच्या दरात तफावत आहे मात्र जीएसटीमुळे एकसमान कर होऊन किंमतीही एकसारख्या होतील.

**15. मेक इन इंडियाला पाठबळ -**

भारतात जोपर्यंत उद्योगक्षेत्र विकसीत होत नाही तोपर्यंत बेकारी व दारिद्र्य कमी होणार नाही. याच उद्देशाने उद्योगक्षेत्राला चालना देण्यासाठी मेक इन इंडिया ही नवीन योजना पंतप्रधानानी जाहीर केली या योजनेला जीएसटीमुळे चालना मिळेल.

**16. उत्पादनक्षमतेत वाढ -**

मध्यंतरी इकोनॉमिस्ट मॅक्झीन मध्ये एक बातमी प्रकाशित झाली त्याबातमीनुसार भारतातील 60% ट्रक रस्त्यावर चालत नाही तर ज्या ठिकाणी प्रवेश कर आकारला जातो तेथे उभे असतात. जागतिक स्तरावर ट्रक

सरासरी प्रति दिन 400 किमी चालतात. अमेरिकेत 750 किमी तर भारतात फक्त प्रति दिन 260 किमी चालतात. कारण एक तर ते प्रवेश कर भरण्यासाठी उभे असतात किंवा प्रवेश कर काही कारणांमुळे मालाच्या किंमतीपेक्षा जास्त असतो म्हणुन तेथेच उभे असतात. भारतात असे 650 प्रवेश कर नाके आहेत. प्रवेशकर नाक्यावरील त्यांचा 20 % जरी वेळ वाचला तर उत्पादनक्षमता 12 % ने वाढेल.

- **वस्तु व सेवा करातील दोष / उणिवा -**

**1. राज्याची आर्थिक स्वायत्तता धोक्यात -**

सद्या भारतात राज्यांना राज्यस्तरावर काही कर आकारण्याचा व कर वसुल करण्याचा अधिकार आहे. राज्य सरकार आपापल्या पातळीरवर त्यात आवश्यक ते बदल करु शकते. मात्र नवीन वस्तु व सेवा कर प्रणालीमुळे राज्यपातळीवरील राज्याच्या अधिकारकक्षेतील सीमा शुल्क, सेवा कर, मुल्यवर्धित कर (व्हॅट) हे अप्रत्यक्ष कर रद्द करुन त्याऐवजी एकच सर्वसमावेशक कर येणार आहे राज्यांना जीएसटी आकारण्याचा अधिकार नसल्यामुळे आपली आर्थिक स्वायत्तता धोक्यात येईल अशी भिती राज्यांना वाटते.

**2. केंद्रावर अवलंबुन रहावे लागणार -**

राज्यांच्या अधिकारकक्षेतील सीमा शुल्क, सेवा कर, मुल्यवर्धित कर (व्हॅट) हे अप्रत्यक्ष कर रद्द करुन त्याऐवजी एकच सर्वसमावेशक कर येणार असल्यामुळे व व्हॅट सारखे महत्त्वाचे कर रद्द होणार असल्यामुळे राज्यांचे उत्पन्न मिळण्याचा अधिकार कमी होणार आहे त्यामुळे राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांना महसुलासाठी केंद्र सरकारवर अवलंबुन रहावे लागेल. त्यामुळेच राज्य, महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्था यांचा वस्तु व सेवा कराला विरोध आहे.

**3. आर्थिक भरपाई -**

वस्तु व सेवा कर प्रणाली लागु झाल्यास राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी होणार आहे. त्यामुळे त्याची भरपाई म्हणुन केंद्र सरकारला मदत दयावी लागेल. राज्यांचे नुकसान होऊ नये यासाठी आर्थिक मदत देण्याची घटनात्मक तरतुद या विधेयकात करण्यात आली आहे. मात्र राज्य सरकार, महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्था यांना आर्थिक भरपाई पुरेशी मिळेल याबाबत खात्री वाटत नाही. पहिली तीन वर्ष 100 %, चौथ्या वर्षी 75 % व पाचव्या वर्षी 50 % भरपाई देण्याचे मान्य केले आहे.

**4. किंमतीत वाढ होण्याची शक्यता -**

जीएसटीमुळे किंमती कमी होण्याऐवजी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जाते. कारण राज्यपरत्वे अस्तित्वात असलेली सद्य:स्थितीतील उत्पन्नपातळी जैसे थे ठेवायची असेल तर किंमती वाढविल्या जातील अशी शक्यता वर्तविली जाते. वस्तु व सेवा कर वस्तुंसह सेवांवरही लागु होणार आहे. सद्या 1000 रुपयाच्या बिलावर सरासरी 12.5 % म्हणजे 125 कर भरावा लागतो. मात्र जीएसटी मागु झाल्यास तो 18% म्हणजेच 180 कर

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

भरावा लागेल. त्यामुळे सेवा स्वस्त होण्याऐवजी महाग होतील.

5. **प्रत्यक्ष अंमलबजावणी नंतरच खरे चित्र स्पष्ट होईल -**

जीएसटीमुळे भारताची प्रगती होईल का ?, जीडीपीमध्ये 1 ते 2 % वाढ होईल का ?, किंमती कमी होतील का ? या सर्व प्रश्नांचे चित्र जीएसटी लागु झाल्यानंतर व प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्यानंतरच एक-दोन वर्षात खरे चित्र स्पष्ट होईल. वस्तु व सेवा कर किती असावा हे ठरविण्याचा अधिकार केंद्राने स्व:ताकडे ठेवला आहे.

6. **वस्तुची गुणवत्ता सुधारेल हा भ्रम -**

जीएसटीमुळे किंमती कमी होतील मात्र वस्तुची गुणवत्ता सुधारेल हा भ्रम आहे. त्यामुळे जीएसटी आणि गुणवत्ता यांचा संबंध लावणे चुकीचे ठरेल.

7. **विकास दराबाबत शंका -**

जीएसटीमुळे भारताचा विकास दरात 2 % ने वाढ होईल असा युक्तीवाद केला जात आहे. प्रत्यक्षात 2004 ते 2008 या कालावधीत जीएसटी नसतांनाही विकास दर 9 ते 9.5 होता. तर 2004 ते 2014 या दहा वर्षात सरासरी विकास दर 7 ते 8 होता. त्यामुळे जीएसटीमुळेच विकास दर वाढेल हा युक्तीवाद योग्य वाटत नाही.

8. **तंटे होण्याची शक्यता -**

जीएसटीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीनंतर तंटे होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. केंद्र-राज्य, राज्य-स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यात तंटे झाल्यास ते सोडविण्यासाठीची तरतुद विधेयकात करण्यात आली आहे. जर केंद्र किंवा राज्य सरकारने जीएसटी मंडळाच्या शिफारशी डावलुन एकदा निर्णय घेतल्यास व त्यातुन तंटे निर्माण झाल्यास असे तंटे सोडविण्यासाठी जीएसटी तंटा निवारण प्राधिकरण स्थापन करण्याची तरतूद विधेयकात करण्यात आली आहे. या प्राधिकरणासाठी एक अध्यक्ष व दोन सदस्यांची नेमणुक केली जाईल.

- **वस्तु व सेवा कर प्रस्तावाच्या अंमलबजावणीतील अडथळे**

1. **कॉंग्रेसचा विरोध -**

व्यापमं घोटाळा, ललित मोदी व सुषमा स्वराज यांच्यावरील आरोप यामुळे कॉंग्रेसचा विरोध असुन हे घटना दुरुस्ती विधेयक कॉंग्रेसनेच आणले असुन त्याचे श्रेय भाजप घेईल अशी भिती कॉंग्रेला वाटते. याअगोदर ज्यांनी विरोध केला आज तेच सत्तेत आहे. आणि ज्यांनी विधेयक आणले तोच कॉंग्रेस पक्ष विरोध करत आहे.

2. **चर्चावर चर्चा -**

जीएसटी करप्रणाली आली पाहिजे यावर विरोधकांसह सर्वाचे एकमत आहे. मात्र ती कशापध्दतीने आणली पाहिजे, त्यासाठी कुठले नियम-कायदे असले पाहिजे यावर फक्त चर्चा होतांना दिसते प्रत्यक्षात निर्णय

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

होतांना दिसत नाही. या राजकिय भांडणात सर्वसामान्य जनता वेठीला धरली जात आहे त्यासाठी संसदेचे काम सारखे-सारखे बंद पडले जाते.

**3. विरोधाचे चक्र कायम -**

2013 मध्ये केरळमध्ये कॉंग्रेस सरकार होते त्यांनीसुध्दा कॉंग्रेसच्या जीएसटी विधेयकाला विरोध केला. ज्या जम्मु काश्मीरचे अर्थमंत्री सल्लागार समितीचे अध्यक्ष होते शिवाय तेथे कॉंग्रेस व एनसी यांचे सरकार होते त्यांनीही कॉंग्रेसच्या जीएसटी विधेयकाला विरोध केला.

**4. राज्य सरकरांना नुकसान होण्याची भीती -**

जीएसटीमुळे राज्यांचे फारमोठे आर्थिक नुकसान होईल अशी भीती वाटते. विशेषत: ज्या राज्यात सर्वाधिक उत्पादन होते अशा महाराष्ट्र, गुजरात व तामिळनाडु राज्यांना सर्वाधिक आर्थिक फटका बसेल कारण वस्तु किंवा सेवा ज्या ठिकाणी विक्रि होईल त्याच ठिकाणी जीएसटी आकारला जाईल. त्यासाठी पेट्रोलियम पदार्थावर जीएसटी लावल्यानंतरही राज्य सरकार त्यावर आपल्या इच्छेप्रमाणे कर लावु शकते. त्यासाठी येत्या वित्त वर्षात 11 हजार कोटी भरपाई देण्याची सरकारने मान्य केले आहे. पण 34 हजार कोटी भरपाई मिळावी अशी राज्यांची मागणी आहे.

**5. जीएसटीमधुन काही वस्तु वगळाव्या -**

जीएसटीमुळे राज्यांचे फारमोठे आर्थिक नुकसान होईल. त्यामुळे जीएसटीमधुन काही वस्तु वगळाव्या अशी राज्यांची मागणी आहे. त्यानुसार अल्कोहोल, तंबाखु यासारखे अमली पदार्थ व पेट्रोलियम पदार्थ वगळण्याचा निर्णय घेतला आहे. असा वस्तुवर राज्य सरकार कर लावु शकते.

**6. 1 % सरचार्ज -**

राज्य सरकारने 1 % सरचार्ज लावण्याची मागणी केली आहे. त्यासाठी ॲडोकेट जनरलचे मत सरकारने मागितले आहे.

**7. विरोधकांचा रोष -**

सुषमा स्वराज, ललित मोदी व व्यापमं घोटाळा यासारखे मुद्दे अनुत्तरित असतांना सरकारने मुद्दाम हे घटना दुरुस्ती विधेयक आणले असा विरोधकांचा आरोप आहे. शिवाय पंतप्रधानांनी यात हस्तक्षेप केला नाही किंवा संसदेमध्ये विरोधकांना साधे आव्हान केले नाही व जीएसटीचे महत्त्वही पटवुन दिले नाही याची खंत विरोधाकाकडुन व्यक्त केली जाते.

**8. संसद चालविण्यात सरकारला अपयश -**

संसद चालविणे ही सरकारची जबाबदारी आहे. भारतीय लोकशाहीचे ते प्रस्तापित तत्त्व आहे. मात्र सरकार संसद सुरळीत चालविण्यात अपयशी ठरत आहे. संसदेत चर्चा न होता वारंवार संसद बंद पाडली जात आहे. याउलट संसद चालु देणार नाही असे आव्हान वैकंय्या नायडु करतांना दिसतात. यासाठी विरोधी पक्षांना एकत्र

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

बोलवुन त्यांच्याशी समोपचाराने बोलुन निर्णय घेण्यात सरकार अपयशी ठरत आहे.

**9. भाजप-कॉंग्रेसच्या राजकारणात जीएसटी अंधारात -**

दोन्ही पक्ष आपापल्या भुमिकांवर ठाम आाहे. भाजप जीएसटी न येण्याचे खापर कॉंग्रेसवर फोडण्याच्या तयारीत तर जीएसटीचे श्रेय भाजपला मिळु नये म्हणुन कॉंग्रेस ठाम. मी म्हणेल ते धोरण आणि मी बांधेल ते धोरण ही भाजपची भुमिका त्यामुळे मंजुरीत अडचण येत आहे.

**10. विशेषत: राज्यसभेत अल्पमत -**

जीएसटी विधेयक लोकसभेत मंजुर झाले कारण लोकसभेत भाजप सरकारला पुर्ण बहुमत आहे. मात्र राज्यसभेत दोन तृतांश म्हणजेच पुर्ण बहुमत नाही. त्यामुळे राज्यसभेत कॉंग्रेसच्या पाठिंब्याशिवाय हे घटना दुरुस्ती विधेयक मंजुर होणार नाही.

**11. विधेयक स्थायी समितीकडे पाठविण्याची मागणी -**

विरोधकांनी जीएसटी हे घटना दुरुस्ती विधेयक स्थायी समितीकडे पाठविण्याची मागणी केली आहे. मात्र सरकारचा त्याला विरोध आहे. 1 एप्रिल 2016 पासुन विधेयक लागु करण्याचा सरकारचा मानस आहे. जर विधेयक स्थायी समितीकडे पाठविले तर त्याला मंजुरी मिळण्यासाठी आणखी वाट पहावी लागेल त्यात वेळ जाईल त्यामुळे एप्रिल 2016 पासुन लागु करता न आल्यामुळे पुन्हा एक वर्ष वाया जाईल.

सद्यातरी वस्तु व सेवा कर किती असेल हे निश्‍चित नाही त्यात बदल होऊ शकतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस, टीएमसी, जेडीयु, बीजेडी, टीआरएस, समाजवादी पक्ष, शिवसेना, इत्यादी पक्षांसह आणखी काही पक्षांनी जीएसटीला पाठिंबा दर्शविला आहे. भाजपची वैचारिक मतभेद असलेल्या पक्षांनीही जीएसटी विधेयकाला समर्थन देण्याची भूमिका घेतली आहे. मात्र आजही कॉंग्रेसचा विरोध कायम आहे. या राजकिय भांडणात सर्वसामान्य जनता वेठीला धरली जात आहे. राजकिय मतभेद बाजुला ठेऊन लोकांना काय सोयीस्कर आहे याबाबत विचार व्हायला हवा. कॉंग्रेस आपल्या मागण्यासाठी ठाम आहे. या प्रमुख मागण्यांमध्ये तामिळनाडु, महाराष्ट्र आणि गुजरात यासारख्या उत्पादन क्षमता जास्त असलेल्या राज्यांमध्ये जो एक टक्का अधिक कर आकारला आहे तो रद्द करावा. यासाठी मोदी सरकार सकारात्मक आहे. मात्र तामिळनाडुच्या मुख्यमंत्री जयललिता यांच्या एआएडीएमके पक्षाने हा कर हटविण्यास विरोध दर्शविला आहे. कराची कमाल मर्यादा 18 टक्के ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे जेणेकरुन कोणतेही सरकार मनमानी करत कर वाढवू शकणार नाही. केंद्र सरकारने या मागणीवर विचार करण्यासाठी मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे.

▪ **सारांश -**

वस्तु व सेवा कर हा एक अप्रत्यक्ष कर असुन तो उत्पादन, विक्रि व वापर यावरील देशपातळीवरील एकच सर्वसमावेशक कर असणार आहे. संपुर्ण देशभर वस्तु व सेवा कराचा दर हा एकच असेल. अप्रत्यक्ष

करांऐवजी वस्तु व सेवा कर येणार आहे. काही वस्तुंचा अपवाद वगळता जवळजवळ सर्वच प्रकारच्या वस्तु व सेवांवर हा आकारला जाईल. वस्तु व सेवा कर ही जगात मान्य झालेली करप्रणाली आहे. अप्रत्यक्ष करात एकसमानता आल्यामुळे व करपध्दतीतील सुटसुटीतपणामुळे व्यापारांना फायदा होईल. जीएसटीच्या माध्यमातुन विभिन्न राज्यातील करांची भिन्नता दूर करुन सर्वसमावेशक असा एकच दर आकारणे, वस्तु व सेवांच्या विक्रित एकजिनसीपणा आणायचा हे महत्त्वाचे उद्दिष्टे यातुन साध्य होणार आहे. मात्र गेली पंधरा वर्ष जीएसटी विधेयकावर फक्त चर्चा व विरोधाला विरोध होतांना दिसतो. वेळप्रसंगी संसदेचे एकत्र आधिवेशन बोलवुन निर्णय घेतला जाईल का ? की अजुन काही वर्ष लोटले जातील यात संभ्रम आहे. त्यासाठी इतर विषयांपेक्षा जीएसटीला अधिक प्राधान्य देण्याची गरज आहे. मात्र 1 एप्रिल 2016 पासुन जीएसटी लागु होण्याची शक्यता जवळजवळ मावळली आहे हे निश्चित, तरीही सुधारीत करप्रणाली प्रत्यक्षात कधी लागु होईल हे येणारा काळच ठरवेल.

- **संदर्भ -**

1. कोबंळे रंजन (2013), *'भारतीय अर्थशास्त्र'*, भगीरथ प्रकाशन, पुणे.
2. देसाई स. श्री. मु. व भालेराव निर्मल (जानेवारी 2014), *'भारतीय अर्थव्यवस्था'*, निराली प्रकाशन, पुणे.
3. महेश पुरोहित (एप्रिल 2014), *'करविषयक सुधारणा आणि जीएसटी भविष्यातील सुधारणांसाठी आव्हाने'*, योजना मासिक, पुणे.
4. Indirect Taxes Committee (201), *`Goods and Service Tax (GST)'*, Institute of Chartered Accountants of India.
5. पाटील जे. झेड (सप्टेंबर 2015), *'जीएसटी - अप्रत्यक्ष करप्रणालीचे भिजत घोंगडे'*, व्यापारी मित्र मासिक, पुणे.
6. संपादक (नोव्हें 2015), *'जीएसटीची ठळक वैशिष्टे'*, व्यापारी मित्र मासिक, पुणे.